म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ८७
१९३८
REFBK-0005631



सुवर्ण पदकें मिळालेला

श्री

राजहंस मेळा पुणें.

आली काय ?

ओटँग

सदानंद कृत

# कोकणची पोर

१९३७] [ किं. १॥ आणा.

॥ श्री गजानन प्रसन्न ॥



# राजहंस मेळा

## सन १९३७

संवाद

## ' सोन्याचा ओरँग ओटँग '

लेखक व कवि

' कमलाकर ' ' आनंदवनभुव

पाट

६०३३

स्थळ प्रत

REFBK-0005631

REFBK-0005631

नंद झपताल. सोन्याचा ओरँग ओटँग.

जगी तात माता, इशा आतां ॥ धृ ॥
करि पूर्ण वांछा, सुखपूर्ण देशा
सुयशपथ झणि दावी, आतां ॥ १ ॥

## प्रवेश पहिला.

( चपला प्रवेश करते )

चपला—काय तरी बाई या मतलब द्वीप राज्यातला नियम न्याय आजपर्यंत असल्या न्यायाची धींड गाढवावरून तरी काढीत होते. आतां तो मेला दिमाखानं विमानातून हिंडतोय, व दीन दुबळ्यावर बॉंबगोळे टाकतोय, आणि देव तरी कसला कुटिल झाला आहे पहा. बदलत्या काळाच्या थपडा बसत आहेत तरी; मावळत्या मिरासदाराना वर देऊन; उगवत्यांच्या कार्यांच्या चहांत मीठ ओततो आहे. वर आहे ती देवकी धाटे वर मिळवून आली आहे काय ? तिला माझ्या सारख्या बहिणीचा; या चपला धाटेचा उत्कर्ष सहन होत नाहीं ? ये म्हणावे, मी नांवाची चपला आहे. माझ्या मागें सारे सुधारक नवमतवादी तरुणांची फौज दुष्काळी मजुरासारखी आरोळ्या मारीत उभी आहे.

( संदेश धाईनें येतो )

संदेश—कोण उभी आहे ? तू ? रहा अता अशीच ठाणवई सारखी उभी; फुःफूस पंक्चर होऊनं हवा जाईपर्यंत. तुला पुसतो कोण आता; पॉलिसिच्या ब्रशान सुद्धा कोणी तुला आता कुरवाळणार नाही. ती देवकी........आली वर मिळवून.

चपला—अरे हो ! आहे मला माहीत. तूं आला आहेस अता शिळा ज्ञानप्रकाश दाखवायला, संदेशा ! तूं माझ्या मागचा आहेस मी केंव्हांपासूनची टणठणंत आहे.

---

**दाबके टेलर्स**

यांचेकडेच

**कपडे शिवून घ्या.**

---

संदेश—उपयोग काय? नुसत्या ठणठणण्यात त्रासच होऊन ठणठणीत मेंदूच्या कवींची प्रतीभा, नापास बी. ए. प्रमाणें, निराश नौकरी इच्छुप्रमाणें, चणे चुरमुरे मनांत खात खात टाकाच्या पिनावरुन पाय घसरून काळ्या समुद्रांत बुडून जाते.

चपला—बस कर जरा कमी बोलत जा की; माझ्यापासून एवढ तरी शीक.

संदेश—आतां तुझ्यापासून कोण शिकतो; देवकी घाटे माझी गुरु !

चपला—अरे चोरा लाज नाहीं वाटत असं बोलायला; कारा प्रमाणं तुझी जीभ एकदम जळून खाक कशी होत नाहीं? तुमच्या सारख्यांच्या दाताचे पीठ करायला एखादा साखरेचा कारखानदार कसा धाऊन येत नाहीं.

संदेश—( मोठ्याने हांसून ) साखरेच्या यंत्राना पायो–रीआ होईल म्हणून !

चपला—फाजीलपणा बंद कर. संदेशा माझ्या अंगाची अगदी आग झाली आहे.

संदेश—हंसून ) तूं मुळातच ओलीं आग आहेस; पण चपलाताई असं मंथरे सारखं बडबडून तूझं महत्व रहाणार आहे ?


# आपण नेहमी टांगाछाप विडी ओढा

एम. ए. कादर, ५७७ बुधवार, पुणें.

चपला—कोणता हरीचा लाल माझं महत्व कमी करणार आहे पाहा ते आतां. संदेशा माझ्या गोटांत तुला रहायचं आहे की नाहीं ? याद राख तू फुटलास तर सौदामिनी देवीकडून तुझी प्रेरणा बंद करून टाकीन. मग पहाते तुझा संचार कसा चालतो तो. ओढून फेकलेल्या सिगारेटच्या थोटकाचीही तुला किंमत मिळणार नाहीं.

संदेश—( मिस्किलपणानं हांसून ) तितकी राहिली तरी काय थोडी आहे. चोरून ओढायला शिकूं पाहणाऱ्या बाळगोपाळांचा पहिला दोस्त म्हणजे उष्टे विडींचे थोटूकच वर कां ! मध्यरात्रीनंतर दचकून उठलेला वीर सिगारेटचं एम्. टी. पाकीट पाहून निराश होतो व निजण्यापूर्वी ओढलेल्या विडीचे थोटूक त्याला दिसल तर त्याला इतका आनंद होतो कीं आनंदाचं उभं, आडव, तिरप, विश्व त्या जळक्या कृष्णमुखीं थोटकांत त्याला दिसतं व तो बेहोष होऊन गाऊं लागतो.... ' थोटका तूच जगी आधार '

पद

आशक हा जीव सख्या तुझ्यावरी खुलावला
नडी आडीला दोस्त एक तू विश्वरूप दावी मजला ॥ ध्रृ ॥
रूप तुझ बघ किती तरी छान, रंग कसा बघ गोरा
गोरापान तोंड बघुन तुझ गेल माझ भान,
लाजविते बघ जणु रजनीला ॥ १ ॥

चपला—चूप रहा मी आतां त्या देवकी घाटेची जिरवणार आहे तूं मला मदत करणार कीं नाहीं. ? ....

संदेश—( आश्चर्यानें ) हे काय ताईसाहेब ? मी तुमचाच आहे ना ?

चपला—पण ऐन वेळीं हुतुतू खेळून शेवटीं सायकलच्यापुढें धडपडून घोटाळा करणाऱ्या खेडवळासारखा तूं आहेस.

२१।५१

संदेश---असेल झाल तस कधी तरी ? पण भर चौकांत चटक चटक चालणाऱ्या अक्कलबाजाची चप्पल तुटली म्हणून कोणी लगेच फेकून देत नाहीं. हातातल्या स्वच्छ पिशवीत हळूच ठेवून दुरुस्त होईपर्यंत तरी वागवतात कीं नाहीं ?

चपला—पण तूं नेमका कार्याच्या घाईंत घोटाळा उडवतोस रस्त्यांतल्या केळाच्या सालपटाप्रमाणें दगा देण्याची संवय आहे तुला.

संदेश—कांहीं झालं तरी मनुष्य व्यवहारी धोरण सोडीत नाहीं. सालपटावरून गुढग्याला गुढगीची कळ आली तरी हांसत हांसत विचारणाऱ्या चहाटळाना, आपल्या तोंडावरचे रडवे विकार न दाखवता, हसरा चेहराच दाखविण्याचा प्रयत्न करतो, व कांहीं नाहीं, लागले नाहीं. असेच म्हणतो—

चपला—असल्या दांभिक व्यवहाराची मला गरज नाहीं. अत्ता ती देवकी अभिनंदकाच्या गराड्यांत इथं दाखल होईल. हार्टी कॉंग्रेसच्युलेशन्सच्या तारांनी तारवटून गेली असेल. तिची मी रेवडी उडवणार आहे.

संदेश—उडवाउडवी करून वाया दवडूं नको. दिडकीला मण या मोलानं जरी महाग विकली तरी गिऱ्हाईक सवंग आहे.

( पडद्यांत देवकी घाटे की जय, सनातन धर्म की जय )

चपला—संदेशा ऐक हे ! आला तो बुंदी मोतीचुराचा राघवदासी कंपू.

— लहाना पासून थोरा पर्यंत परवडणारे फोटोचे दर —

## एडवर्ड फोटो स्टुडियो

लक्ष्मी रोड, पुणें.

( देवकी घाटे गळ्यांत हार घातलेला, झंगटराव हातात झंगट घेऊन विष्णौपंत क्षीरसागर हातांत घंटा, परशुराम भाऊ नारळीकर हातात चिपळ्या, सुशीलाबाई झांजले हातात झांज घेऊन प्रवेश करतात. ]

झंगटराव—काय चपला ताई तुमच्या थोरल्या वहिणीचा हा विजय पाहून मी अगोदर तुमचं अभिनंदन करतो.

( झंगट वाजवतो )

परशुराम—अवश्य ? अवश्य ? याबद्दल मी या चिपळूणच्या चिपळया वाजवतो ( वाजवतो ).

चपला—( रागानें ) अवश्य ! अवश्य काय ? जिभेला हाड आहे का तुझ्या, उपकाराची कांहीं जाणीव !

परशुराम—अवश्य ! अवश्य ! अभिनंदन केलं हे अवश्य.

चपला—असं ! धड डोक्यानं बोला !

सुशीला—याबद्दल मला होत असलेला आनंद मी झांज वाजवून उघड करते.

विष्णूपंत—अहो काय वेड का खूळ लागलयं तुम्हाला ! कोणाचं अभिनंदन करतां ? देवकी घाटेचं कीं नाही ?

परशुराम—अवश्य ! अवश्य ! अत्यावश्य.

संदेश—काय अत्यावश्य ? पाठींत लाथ मारून अत्यावस्य करुं वाटतं. ( दरडावून ) अभिनंदन चपला ताईचं कीं नाहीं ?

---

आर. एन. गोडबोले यांची

**कमला कस्तुरी तपकीर**

शुक्रवार, पुणें.

---

परशुराम—अवश्य ! अवश्य ! अशक्य........

सुशीला—हे काय तरी बाई ! आमच्या वेळेला असं नव्हतं. मानपानाचा हक्क वडीलधाऱ्यांचा व लाथाबुक्क्यांची मिराशी नकट्या धाकट्यांची.

चपला—अहो झांजळे आतां काळ उलटला आहे. तव्यावर पोळी उलटून टाकली आहे. चटके सोसाना.

देवकी—बंधूंनो, तंटा करुं नका ! चपला व मी एकाच आईचीं लेकरं आहोत. मधल्या बोटाची कळ जरी इतर बोटांनीं पत्करली नाहीं, तरी बासुंदी भुरकायच्या वेळेला साऱ्यांचं ऐक्य होतें; हा सृष्टीचा नियम लक्षांत घ्या. एकान ढेकूण मारला म्हणून दुसऱ्यानें पिसू मारुं नये अन् तिसऱ्यानं डास मारुं नये कारण पिसू सापडत नाहीं व डास उडून जाऊन थोबाडीत आपणाला बसते. दुसऱ्याच्या आनंदांत आपण आनंद मानावा. माझ्या अपमानानं चपलेला आनंद होत असेल तर त्यांतही मी आनंद मानीन.

---


दररोज नवीन गरम

व

स्वच्छ माल मिळण्याचे एकच ठिकाण

—:— म्हणजे —:—

# संतोष भुवन.

गरम घावन, बटाटाखिचडी

हुजूर पागे समोर पुणें. २

मा. गिरियप्पा

सुशीला—वाहवा ! काय मन थोर ! काय सात्विक ! वडाला गुंडाळलेल्या ज्या सुतानं स्वर्गाला जाऊन सावित्रीनं सत्यवानाला आणलं त्या दोऱ्यानं या देवीचं दुपटं शिवाव बरं ऽ ऽ

झंगटराव—अलबत, पण असली दुपट्यालेपट्यांतील उदार वृत्ती यावेळीं नको. झांजले तुम्ही स्वार्थासाठीं असलीं दुपटी ठिगळली तरी, विड्या ओढून, त्याच्या नकळत पडणाऱ्या ठिणग्यांनीं त्या दुपट्यांची जाळीदार मच्छरदाणी करूं.

चपला—काय वाटेल तें झालं, पर्वताचं पाणी होऊन समुद्राचें डोंगर बनले तरी अभिनंदन माझंच झालं पाहिजे, हा वर मिळण्याला कारणीभूत मी आहे. माझा झगझगाट इतका वाढला नसता; तर वर मागण्याची देवकीला बुद्धीच झाली नसती.

संदेश—अहो अवश्यराव, अवश्य अवश्य कां म्हणत नाहीं या वेळेला! बूच बसल्यासारखा तोंडाचा चंबू करून काय बघतां ?

— श्रीखळनाथ प्रसन्न —

मध्यप्रांत. व वऱ्हाड, खानदेश मुंबई ईलाखा वगैरे ठिकाणीं प्रसिद्धीस आलेले व खात्रीनें मिळण्याचे १ च ठिकाण.

**जी. व्ही. पेंडुरकर सराफ.**

**तुळशीबाग गणपती जवळ**

आमचे येथें खऱ्या व कल्चर्ड मोत्याचे, सोन्याचे दागिनें व चोख चांदीची भांडी योग्य भावानें मिळतील व आर्डर दिल्यास आमच्या देखरेखी खाली तयार करून मिळेल.

माल वाईट निघाल्यास परत घेऊं.

परशुराम—अवश्य ! अवश्य ! चपलेचा कोटीक्रम, चकचकीत लेदर बॅग घेऊन, टेचांत जाणाऱ्या नव्या वकीलाइतका अपटूडेट दिसला तरी त्याच्या प्रॅक्टीसइतकाच तो भक्कम आहे. चपलेचं अभिनंदन अवश्य, अशक्य !

संदेश—काय अशक्य ? शॉर्ट साईट म्हणून लावलेल्या चष्म्यांतून, काळाच्या भगदाडापलीकडे अनंतात आरपार पहाणारे आम्ही जातीवंत वीर आहोंत. तुम्ही उग्र रूपासाठीं वराच्या घमेंडीच्या दाढ्या वाढवून त्यांतील जंगली श्वापदं, खाजवून आम्हावर सोडतां आहांत, पण लक्षांत ठेवा व्हायलेटच्या सेफ्टी रेझरनं तुमचं फारेस्ट साफ करून; काळमोरच्या लोण्यानं तुळतुळीत करतो पहा. काय समजलांत ? आम्ही जातीवंत वीर आहोत.

विष्णूपंत — कुणाला दमाची दारू ठासता ? आम्हींही कांहीं कमी नाहीं. आमच्या इथल्या खंडु, पांडु, न्हाव्याच्या साडेसात आणे तीन पै वस्तऱ्याच्या धारेनं, धारेकडून नाहीं, मुठीकडून तूमच्या डोक्यावरचं हे राजगीरेचं म्हणजे, इंग्रजी अकलेच गवत खुरपून काढूं लक्षांत ठेवा.

झंगटराव—इतकंच काय ! पण मानवाच्या मूळजातीच्या फॅशनचे तूमच्या खडकाळ चेहेऱ्यांचीं सालपटें सोलून गुलाबी कोड्याच्या कवींकडे पृथक्करणाला पाठवूं. लक्षांत ठेवा.

देवकी—सूज्ञ बंधूंनो, तूमच्या मुखांतून वहात असलेल्या गटाराचा हा प्रीतीसंगम पुरे करा. मी आपल्या हातानं माझ्या धाकट्या बहिणीच्या गळ्यांत ही पुष्पमाला घालतें.

झंगटराव—छट् थांबा. तत्वांना डांबर फासून केलेले काळे फळे काय शाळानिहाय खैरात करायचे आहेत वाटतं ?

संदेश— ( हांसून ) डांबर नको असेल तर 'पोपट छाप' पॉलीश फासा—

झंगटराव—होय, होयं, पॉलीश फासणार आहे. पण ते तुमच्या तोंडाला. कोडगेपणानें बुटानें सडकून तुमची कातडीं शामाय लेदर सारखीं कमावलीं आहेत त्याला पॉलीश करतो.

परशुराम—अवश्य, अवश्य, म्हणजे अबिसिनिआच्या सैनिकांत पार्सलनें किंवा हुंडीनें यांना पाठवूं.

देवकी—हा तंटा आपणच मिटवूं चपलाताई. मी येतां येतां ऐकलं आहे कीं, बच्चू इंगळे, कवडे, फुरसे यांचे कमीशन, येथून आपलं उच्चाटन करण्यासाठीं भुजंगरावाकडे परवाना मागायला गेलं आहे. तेव्हां आपण आपसांत..................

विष्णूपंत—खुशाल सलोखा करा. तरी आम्हीं मुळीच जुमानणार नाहीं. पुढाऱ्यांचा सलोखा होऊन एकमत झालं तरी अनुयायांनीं जोडा-जोडी चालू ठेवण्याच बाळकडूं नव्हे, पंचगव्य मी सातव्या वर्षापासून घुटकीत आलों आहे.

देवकी—ताई तूं माझं ऐक, जाहीर सभेंत मी तुझं अभिनंदन करते वर्तमानपत्रांना दशदिशा भुंकायाला लावते. विड्यांच्या लेबला-वर तुझा फोटो छापून खेडोपाडीं तुझी प्रसिद्धी करते.

सुशिला—इश्य ही काय तऱ्हा! कर्णानं उदारपणा केला तरी नुसती कुंडलाची कवचेच दिलीं होती. व्यासानींच हे लिहिलं आहे.

झंगटराव—सुशिलाताई, तुमच्या पुराणाचं हें अगाधज्ञान ऐकून व्यासांना चवरं हींव भरलं आहे.

सुशिला—मग शनिवारी विडा देईन करून. नाहींतर डॉ. इब्लीसना बोलवा.

के. जी. कोल्हापुरे यांची वसंत तपकीर
कारखाना रेमार्केट रोड, पुणें. २

५६३९ 
काव्य. १९५ २१(१)

झंगटराव—( स्वगत ) त्यांचीच बहीण वाटतं तूं ( उघड ) आतां असं बोलून पाहूं. हे पहा चपलाताई, मी सुद्धां अता अनुकूल आहे. देवकीताईचं म्हणणं योग्य आहे. त्यांना वराची प्राप्ती झालेली आहे. आता पारिजातकाचा वृक्ष सत्यभामेच्या मंदिरीं जसा कृष्णानें राहूं दिला, तसा हा देवकीताईच्या मेहेरबानीनें मिळत आलेला मानमरातब पत्करा. वरसिद्धीच्या पुष्पमाला रोज करतीलच देवकीताई. विष्णूपंत होऊं द्या कीं चपलेच अभिनंदन; उगीच कां रडवतां !

चपला—ए झंगट्या बस्स कर तुझ्या झंगटाचा ठेका. मला जरूर नाहीं असल्या पोकळ अभिनंदनाची; पहाते मला वर मिळवता येतो का ते. चल रे संदेशा, समजला यांचा कावा. ( जाऊं लागतात )

देवकी—ताई थांब जरा, अशी सोडमुंजीतल्या मुंजासारखी काशीक्षेत्राची वाट धरुं नको.

चपला—पुरे पुरे हा मानभावीपणा. आत्ता येते वर मिळवून. ( संदेश व चपला जातात )

झंगटराव—काय-विष्णूपंत कशी युक्ती आहे. सुंठीवाचून खोकला गेला.

परशुराम—अवश्य, अवश्य. धक्के मारल्यावाचून विमा एजंट गेला.

विष्णूपंत—दक्षणेवाचून भट पळाला.

सुशीला—ताकावाचून आजीबाई गेल्या. आता हा हार व त्याबरोबर जबाबदारीचं लोढणं या राणीच्या गळ्यांत अडकवते.

---


**हिंदमाता मोटार सर्व्हीस कोल्हापूर.**

**पुणें ते डायरेक्ट कोल्हापूर.**

बुधवार चौक पुणें. एजन्ट आर खाटेकर

झंगटराव— ( स्वगत ) आता खुशाल वरसिद्धीचिया कुरणांत मोकाट चरा. ( उघड ) बोला देवकी कीं जय ( जयजयकार करतात. )

( बच्चू इंगळे, फुरसा कवडे, डॉ. इस्पिक व दोन प्यादी, कमीशन येते. )

बच्चू—देवकी, तुम्हाला मी अनेक वेळा सांगितलं कीं तुमचा हा दंगा बंद करा. तुम्हाला मुलाखती द्यायच्या झाल्या तर मुक्यानं देत जा.

झंगटराव—तसा प्रघात नाहीं.

फुरसा—अघात करून तुमचा विघात केल्यावर पडेल ना प्रघात. तुम्ही बोलू नका मधें. ही हातांत प्लेट कसली धरली आहे. ( झंगट हिसकावून घेतो )

बच्चू—देवकी या मतलबपूर संस्थानांत आम्ही आतां कोणी परके राहिलों नाहीं. हें संस्थान आमचं आहे, नव्हे कांहीं वर्षांनीं या संस्थानचे आम्ही संस्थानिक होणार आहोत, हे लक्षांत ठेवा. तुम्हा अजागळांचा धांगडधींगा आम्हाला आत्तापासून बंद करायला हवा.

इस्पीक—हे पहा, हा शेजारधर्म आहे. हा तुम्ही पाळायला नको ? तुम्हाला माहीतच आहे, बच्चु फुरसे यानीं जातीवंत अवलादीची कुत्रीं पाळलीं आहेत. बच्चू इंगळेचीं १२॥ त्यांत एक पिलू आहे, म्हणून ते अर्धे धरले. व फुरसा कवडेचीं, तोंडावर रंगीत टिकल्या असलेलीं ५२ आहेत. बरं या ठिकाणीं नुसते तुम्ही बोललांत; नव्हे मनांत विचार केला तरी त्यांना त्रास होऊन तीं भुंकूं लागतात व त्या भुंकण्याचा मालकांना त्रास होतो, म्हणून तुम्हाला अशी ताकीद द्यायचं कारण.

विष्णूपंत—काय डॉक्टर इस्पीक कुत्र्याच्या पुड्या तुमच्या दवाखान्यांत नाहींत वाटतं.

बच्चू—चूप तीं कुत्रीं आमचीं आहेत आमच्यातले ढेकूणही आम्ही मारणार नाहीं.

फुरसा— साप, विंचू, खेकडे, गोमा, पालीसुद्धां आम्ही मारणार नाहीं. तुमच्यासाठीं ही कंपनी चालवावी लागते.

स्थळ प्रत
नं. ...... नं.

बच्चू - ही कुत्रीं तूमची असतीं; तर कुत्रीच काय पण कोणताही लहान मोठा प्राणी, कांद्यासारखा सोलला असता.

विष्णूपंत:— खरच, पूर्वजन्मीं या कुत्र्यांनीं कांदे नखाच्या सशास्त्र करून पुण्य संपादन केलं आहे म्हणून इहजन्मीं त्यांना तुमच्यासारखे मालक लाभले.

बच्चू—-तूमची रिकाची बडबड ऐकण्याला आम्हाला सवड नाहीं. आमच्यापुढें कमाचा इतका ढीग आहे कीं त्यातलं कोणतच काम करायला पुरसत नाहीं.

देवकी—-हें पहा हें घर भीमाजी नाईक कोलदंडयांनीं मला दिलेलें आहे. या ठिकाणीं तुम्ही अशी दंडेली करणं हें सुशिक्षितपणाचें लक्षण नव्हें.

फुरसा—लक्षण कशाचं आहे हें आमचं आम्ही ठरवूं. तुमचीं तोंड बंद झालीं पाहिजेत. तुम्ही बऱ्या बोलानं ऐकलं नाहीं तर विलक्षण प्रकार घडेल, लक्षांत ठेवा.

---


दिवसा व रात्रौ

[ पुण्यांतील ]

— सुंदर फोटो काढण्याची उत्तम व्यवस्था —

किर्लोस्कर थिएटर माडीवर

आमचे कडे लहान फोटो वरून फोटो रंगीत करून मिळतील, तसेंच सर्व प्रकारचीं फोटोंचीं कामें माफक दरानें करून देऊं,

फोटोग्राफर एस. एम. साळवी.

देवकी—अस्सं ! ठीक आहे. डॉ. इस्पीक दंडेलीचा बंदोबस्त तुमच्या कायद्यानी होणार नाहीं अशी का तुमची समजूत आहे ?

इस्पीक—मला वाटलंच तुम्हाला कायदेबाजीची लहर येणार म्हणून. ठीक....त्याला तरी....कुठं वायदा आहे. हा पहा कायदा. ऐका, मतलबपूर संस्थानच्या दिवाणांचा हुकूम (वाचतो) हुकूम देण्यांत येतो कीं, देवकी घाटे यांनीं देवीजवळ वर मागून घेऊन महत्त्व संपादन केलं आहे. त्यामुळें त्यांच्या राहत्या घरांत सारखी बडबड सुरू असते, याचा फिर्यादींना अत्यंत त्रास होऊन फुरसाचा व बच्चूची कुत्री भुंकू लागतात, गळ्याचा नळा काढून रडूं लागतात. बंगल्यावर पांखरे बसतात, माशा हिंडतात व फिर्यादीच्या निष्क्रीय कार्यमग्नतेंत व्यत्यय येतो. अंथरुणावर पडण्यापूर्वी झोंप येत नाहीं. जांभईमुळें एव्हढा आ वासतो कीं त्यांत खाद्य पदार्थाचा तुकडा पडल्याशिवाय तो मिटत नाहीं. ही फिर्याद विचारांत घेऊन असा हुकूम देण्यांत येतो कीं, देवकीनें बोलू नये. देवकीशीं कोणी बोलूं नये या विरुद्ध वर्तन घडल्यास मतलब पिनल कोडांतील, अंकविरहित १०१ व्या कलमाप्रमाणें २५ रुपयांची वेलूची दंड व दोन महिने दिवाणांच्या उपोषणाला पुरेल इतक्या फक्त खजुरी बोऱ्याची शिक्षा अथवा दोन्ही शिक्षा भोगण्यास तो पात्र होईल.

परशुराम— अरे बापरे,....मी निघालो शंकरराव श्रीखंड्याकडे, पक्षाचे आमंत्रण आहे तिकडे लवकरच गेले पाहिजे (जातो)

फुरसा— पाहिजेना हुकूम, घ्या आता. देवकी त्यापेक्षां इथून घरासकट उठून जाईनास ? उगीच का त्रास सोसतेस.

देवकी—मुळींच जाणार नाहीं. चोराला बिस्कीट व धन्याला कस्पट काय ?

प्यादे—कोणी बोलूं नका, गुन्ह्याला पात्र व्हाल.

इस्पीक— प्यादे, मी तुम्हाशी बोलतोय, देवकीशी नाहीं ? तुम्हीं हुकूमाप्रमाणें पहारा करा आम्हीं जातो आता ( बच्चू. पुरसा बाकुल्या दाखवीत डॉ. इस्पीकबरोबर जातात. )

झंगटराव - प्यादे, मी हवेत बडबडतो आहे, देवकीशी नाहीं या अपमानाचा सूड घेईन तेव्हाच हा झंगटराव गप्प बसेल. झालाच अता माझ्या झंगटाचा ठेका सुरू. ( जातो )

प्यादे—-देवकी. आम्ही हुकुमाचे बंदे; आम्ही काय करणार ? पण आम्हाला सुद्धां हा हुकूम अन्यायाचा वाटतो.

दुसरे प्यादे —अरे भाई, बात मत करो, भिंतीला सुद्धां कान असतात देवकी हम खाना खानेकू जानेवाले है; तुम उदर बैठो, मत जावो, ( जातात )

देवकी- —काय हा अन्यायाचा बाजार देवा.

---


ज्याला — पैशाचा — पूर्ण मोबदला
पाहिजे असेल तर

फक्त

बांदिवडेकर सराफ

— यांचे येथेंच या —

कोणतीही वस्तु मनपसंत
सर्वांग सुंदर, आवडी प्रमाणें
मिळेल.

उंची कल्चर्ड मोती कमी किंमतींत देऊं

### पद २ रें.

इश परिन पूर्ण त्रास, होत विकल मन उदास ॥ ध्रृ ॥
दाविती जणु भाव, परि सुयशहि धन पदास,

अंक समाप्त.

## अंक दुसरा

( चपला व संदेश येतात. )

संदेश—चपलाताई, एखाद्या ट्रॅन्सफर सीनप्रमाणें तुझं मन बदल-लेलं पाहून साऱ्या जनतेंत, पुणेरी टांगेवाल्याची जिरवल्यासारखा आनंद झाला आहे.

चपला—अरे माझं महत्त्व वाढायची हीच संधी आहे. हें मी ओळखलं आहे. यांतूनही देवकीची सुटका करण्याचं काम झालं कीं, माझा उदो उदो किती होईल याची कल्पनाच करायला नको. माझ्या अध्यक्षस्थानाशिवाय, एकही सभा उजवायची नाहीं, बातमीदाराची बारी लागेल, माझ्या मुलाखतीसाठीं. तरुणांना, वीरांना, राष्ट्रवीरांना विधवांना माझा संदेश देण्यासाठीं संपादकवर्ग गिधाडासारखा तुटून पडेल माझ्यावर; आहेस कुठं; पहा माझी योग्यता केवढी आहे ती.

संदेश—( हांसून विनोदानें ) ती तुला माहीत नी मला माहीत. तुझी विद्वत्ता केवढी दांडगी, नापासाशिवाय शेरा लिहिण्याची छाती झाली नाहीं कधी, तुझ्या नांवापुढें परीक्षकांची. तुझ्या मेंदूत वाटा-ण्याचा केव्हढा ढीग भरला आहे याचं गणीत करतां करतां सारे रॅंग-लर वैकुंठाला गेले.

चपला—( हांसत हांसत ) हं आली तुला पुन्हा प्रतीभेची लहर, ऐक कर, जरा जीभ ( रागानें ) भुजंगराव प्रधान काय म्हणताहेत? तुमच भांडण तुम्ही मिटवून घ्या; पण हे असं मिटणार नाहीं. रंगे-लाशीं दुबळ्या सज्जनांचा समेट होत नाहीं.

( झंगटराव झगट वाजवीत येतो )

झंगटराव—कोण चपला,....संदेश. हा आकांत आतां थांबणार कसा ? देवकीशीं बोलण्याचा गुन्हा करण्याची लहर आता नूतन मराठींतील मराठी शाळेतल्या, लहान लहान मुलांनासुद्धां आली आहे. ही साथ आता अगदी इन्फ्लूएंझासारखी पसरली आहे. व त्यांत मुंग्यांची रांग चिरडावी त्याप्रमाणें बळी पडताहेत. तुझं मतपरिवर्तन झालंलं ऐकून ती झंगट वाजवीत ' बालम खिरे ' विकणाऱ्या पोरासारखा मी ओरडत आलों आहे पण....

चपला—हे पहा झंगटराव हा देवकीच्या अर्धवटपणाचा परिणाम आहे. वर मागून घेतला पण तो पचवायला जड गेला. हवी मागून घेतांना त्याच्या एका घासाला पुरतील एवढं केस तरी डोक्यावर आहेत कां नाहींत याचा विचार करायला हवा होता.

झंगटराव—होय ते झालं. पण मला आतां असं कळलं आहे तूं देवीपासून जादूची आंगठी मिळवली आहेस व तिचा स्पर्श शत्रूंना होताच त्यांना यातना होतात म्हणे.

चपला – ( मनाशी ) अगबाई, याला कसं कळलं. मी सांगणार नव्हते. अंधारातल्या गोष्टीसारखं गुप्त झालं होतं.

झंगटराव—देवकीला दृष्टांत झाला आहे कीं चपलेचीं वासना सुधारल्यामुळें तिला मी जादूची आंगठी दिली आहे. व तिच्या योगानें ती लवकरच मुक्त करील म्हणून.

---


**दररोज नविन गरम व स्वच्छ माल मिळण्याचें**

**एकच ठिकाण म्हणजेच,**

# दासबाबू रेस्टॉरंट

रमार्केट रोड, बी. बो. निकम.

( विष्णुपंत, परशराम, सुशीला येतात. )

सुशीला--ताई चपले आतां फार वेळ त्या माऊलीला आणि तिच्यासाठीं संकटांत सांपडलेल्या भक्तांना सोडव बाई.

चपला – हाय सुशिलाबाई मी त्याच उद्योगांत आहे, अगोदर ताईची गांठ घेऊन येते, मग सुटकेला काय उशीर, ( चपला की जय असा इतर जयजयकार करतात )

डॉ. इस्पीक--( रागानें प्रवेशून ) खामोष इथही तुमचा गांवढळपणा चालला आहे का? मी या रस्त्यानें जातो. तुमच्या या आवाजानें माझ्या या कानाचे पडदे आरपार फाटून कानाची नुसती सोनारी फुंकणी होत आहे. कळत नाहीं ?

परशुराम---अवश्य, अवश्य, 'वेणुधमंन्या प्रबोध्य.... '

इस्पीक---चूप,सुंठ थाप्या कपाळशूळ उठला आहे म्हणून सुंठ थापलीस वाटतं नशबावर.

परशुराम---अवश्य, अवश्य, माझ्या नशिबाच्या कवटीला, ब्रम्हदेवाला अखंड हाड मिळालं नाहीं. म्हणून त्यानं ते टाकडचा टुकडयांनीं माखून काढलं आहे व त्याच्यावर सिमेंटचा गिलावा केला आहे हा डॉक्टर साहेब.

इस्पीक---घाणेरडा डुक्कर वडबडतो कीतो आतां भुजंगराव प्रधानाकडून हुकूम आणून तुम्हा साऱ्यांची वाट लावतो. ( जाऊं लागतो. )

---


## हायक्लास फोटो काढण्याचें

❀ एकच ठिकाण ❀

## पारगे-स्टुडिओ

बाहुलीचे हौदा शेजारीं

बुधवार चौक, पुणें. २

चपला--अहो डॉक्टरसाहेब जरा इकडं या साऱ्यांची वाट लावल्यावर या. ओसाड नगरीत तुमच्या आग्यासोमल प्रासादिक, ' वचनाग डिस्पेन्सरी चालणार कशी ?

इस्पीक--त्याची काळजी नको तुम्हाला तुम्हा उन्मत्तांना हांकलून तुमच्यां घरांत आमच्या लोकांची, रायवळी अंब्याची हजारों पार्सलं कोंबीन त्याला वेळ नाहीं आता लक्षांत ठेवा.

चपला--असं काय ? या संस्थानांत पाय ठेवल्यांपासूनच हा तुमचा कावा आहे. आणि आमच्यातले रा. स. भ. ही तुम्हाला डोक्यावर घेताहेत नाही का. ठीक आहे. पण ए मुडदेफरास तू इथं कुणाच्या परवानगीनें आलास ?

इस्पीक—अग जा. तूं माझा डायरेक्ट इन्सल्ट करतेस ? माझी योग्यता विसरलीस वाटत. काय बालटीस, पुन्हा बोल, दोन पैशाच्या चिचुंद्र.

चपला—चालता हो इथून तुझ्या अमोनियान भूल पडणारी मी रासभाच्या जातींतली नाहीं ते रासभ तुझी योग्यता मानीत असतील चल चालता हो.

परशुराम—अवश्य, अवश्य, गच्छ, गच्छ, गो आऊट, गो आऊट, सूबाल्या कर, अब चलीये.

---


## भुरके सराफ.

तुळशीबाग गणपती शेजारी खरे कल्चर्ड व सोन्याचांदीचा
माल पसंत नमुन्या प्रमाणे घाट बंद तयार करुन देऊं.
खरा कल्चर्ड व शुद्ध चांदीचा माल मिळण्याचे तुळशीबागेंतील
१ च ठिकाण, या पहा. व खात्री करा.

भुरके सराफ.

इस्पीक—काय सूबाल्या ( त्याचे अंगावर जाऊन हात उगारतो चपला हात धरते व डॉ. ओरडतो व कोलमडून पडतो )....हा, तूं कोण जादूवाली आहेस काय ?

चपला - हां बडबड बंद कर, एकदम चूप. नाहीतर सात्विक संतापाच्या होमकुंडांत तुझा पहिला बळीं पडेल, हं उठ, बैस, हात उचल, खाली वाक, ताठ उभा रहा, आता इथ थांब. तुझ्या अता बच्चूफुसा बिबु खेकडे आणि कंपनीला पाठवते. ( चपला देवीकी जय असा जयजयकार करीत डॉ. इस्पीक शिवाय सर्व जातात. )

इस्पीक—काय ही अवस्था घरांत. पाहुण्यासारखं राहून घरमालकाला उडवण्याचं कारस्थान करायला गेलो पण मालकानं यमाजी भास्कराकडूनच पक्कड वारंटे बजावण्यास सुरवात केली.

( दुरंगे येतात )

दुरंगे—अहो डॉक्टरसाहेब नमस्कार—सप्रेम नमस्कार.

इस्पीक—हो हो, तुम्ही होता कुठं इतके दिवस.

दुरंगे—चप्पलचा आंगठा सांधण्यासाठीं कानपुरला गेलो होतो हल्ली पहिलं राजकारण फिसकटलय.

इस्पीक—कोणतं ?

दुरंगे—वा ! विसरलात वाटतं. चुकलो तुमची स्मरणशक्ती चांगली आहे. रागाऊ नका ते जुनं राजकारण हो. शेंडीच्या केसाचा तारायंत्रांतील तारेसाठीं उपयोग करून तारांना हरताळ फासण्याचं.

खास दिवाळी दसऱ्या करितां
स्वस्त आणि वेळेवर पेंन्टिंग काम करुन देऊ,
भेटाः— नॅशनल पेन्टिंग वर्क्स.
५९१ बुधवार, पुणें.

इस्पीक हे पहा तुमचें तें राजकारण टाका बुडवून फाऊनटनमध्यें. तुम्ही जगन्मान्य लोक पण हा गांवांतला बखेडा कांहीं तुमच्यानं मोडवत नाहीं.

दुरंगे—असं कसं होईल ! आम्हाकडे देवकीकडून फिर्याद आली आहे. त्यांत बच्चू फुरसा, तुम्ही अन्यायी....

इस्पीक—काय अन्याय ? आमची कदर तुम्हालाही नाहीं वाटतं ?

दुरंगे—छे, छे, तुम्ही अन्याय करीत नाहींच. रागांवू नका. म्हणून आम्ही उत्तर दिलें आहेच. या प्रश्नाचा न्याय निकाल लावून घेणें हें सूज्ञपणाचें आहे. आम्हाला यांत पडायच नाहीं. आमच्या तत्वाप्रमाणें आम्हाला सर्व समान आहेत. उलट आम्ही घरच्यांना लाथ मारून घराबाहेर काढूं.

इस्पीक—कसं बोललात. आम्ही या संस्थानांत किती तरी अल्प. आमच्या ह्या सारख्या तक्रारींनें राजेसाहेबांना होत आहे त्रास, म्हणून आम्ही कांहीं पॅवर्स मिळवण्यासाठीं भुजंगरावाकडे मागणी केली आहे. म्हणज आमचे आम्हा संरक्षण करूं शकूं म्हणजे आम्हाला तरी त्रास होणार नाहीं.

दुरंगे—खरं आहे आम्ही सुद्धां या कामीं तुम्हाला मदत करूं.

संदेश—( प्रवेशून ) तुम्ही त्यानांच मदत करा, करणारच तुम्ही कारण तुमचीं तत्व विश्वव्यापी आहेत. तुमचं अहिंसेच तत्व घरांत दूध पिऊन माणसाना दंश करणाऱ्या कृष्णसर्पांना ठेचू नका असंच आपल तत्व म्हणतं....

के. जी. कोल्हापूरे यांची

**वसंत—तपकीर**

कारखाना रेमार्केट रोड ५८० शुक्रवार, पुणें.

५६३९

इस्पीक असूं द्याहो, बर संदेशराव चपलाताईन काय काय केलं आहे तिकडे जाऊन ?

संदेश—कळेलच लवकर, तुम्हाला त्याची बिलकूल काळजी नको.

इस्पीक—तस नव्हे हो, चपलाताईचं म्हणणं खरं आहे त्यांच्या कार्यसिद्धीला आम्हीही हातभार—

संदेश—बस्स करा मानभावीपणा. आमच्या मनगटानं आमचं आम्ही कार्य करायला समर्थ झाल्याची प्रत्यंतर आलीं. तेव्हां तुमच्या मेंदूतलें जहर उतरलं. तुमच्या हाताचा भार मुळींच आम्हाला नको.

दुरंगे—असं बोलू नका, आपण एक आहोत सर्व समान आहोत. साऱ्यांच ऐक्य करण्याचं हे युग आहे. पक्षपात घालवला पाहिजे.

संदेश—त्या पक्षाची खीर चटावर बसून प्यायला चटावलेलें तुम्ही ! तुम्ही खुशाल भुरका जा. आमचं दुर्दैव संपलं नाहीं तोपर्यंत खेकडयासारख्या नेहमीं तिरकस चालणाऱ्या दंशक प्राण्याला खिशांत बाळगण्याची तुमची रीत नाहींशी होणार नाहीं.

( पडद्यांत चपला घाटे कीं, जय देवकी कीं जय सर्व पात्रे येतात. )

चपला—हं बच्चू, इंगळे, फुरसा कवडे, महाराणी साहेबांचा हुकूम मी तुम्हा सर्वांना वाचून दाखवते. ( वाचते ) फिर्यादीच्या अन्याय फिर्यादीवर निकाल देण्यांत येतो कीं सर्व आरोपींना मुक्त करावे. आणि इत:पर फिर्यादीविरुद्ध फिर्यादी आल्यास फिर्यादींना संस्थानची हद्द सोडून जावे लागेल ( टाळ्यांचा गजर )

**थोड्या वेळांत व कमी खर्चांत मोटारचे शिक्षण देणारी संस्था.**

# कुलकर्णी मोटार स्कूल.

शनवार पेठ, नवापूल पुणें.

इस्पीक---काय असा हुकूम देतात राणीसाहेब ? आणि भुजंगराव प्रधानहीं.

परशुराम---अवश्य; अवश्य, प्रधानजींना जादूच्या आंगठीतील यमपुरी दिसूं लागली तेव्हां सारं....अवश्य अवश्य.

चपला---बच्चू फुरसा आमचा जयजयकार करा. प्रत्येकानें हें हार देवकीच्या गळयांत घाला.

इस्पीक---आम्हाला दाद मागूं द्या.

चपला---या, दाद मागायला, ही पाहिली कां आगठी.

बच्चू---डॉक्टरसाहेब विचार करा. यावेळीं चपलाताई हा हार मी देवकीताईचे गळ्यांत घालतो ( घालतो ) ( जयजयकार )

चपला---बंधूनो, भगिनींनो, मी व्याख्यान देते कीं काय असें वाटून भिऊं नका. फक्त एव्हढेच लक्षांत ठेवा. चमत्काराशिवाय नमस्कार होत नाहीं. व्यापक तत्वाच्या कागदी फुग्यांतून गोड हलवा वाटला म्हणजे ऐक्य राहतं ही भूल आहे. दुर्बलांनी सबल झाल्याशिवाय सबलाशीं ऐक्य होणार नाहीं.

विष्णूपंत---पण अभिनंदन कोणाचं हा प्रश्न राहतो आहे अजून ?

परशुराम---अवश्य, अवश्य, तो प्रश्न ओंकारेश्वरीं गेल्यावर सुटेल.

**समाप्त**

---

पोपटलाल डी. मेहता

**ॲटो मोबाईल**

स्पेशॅलीस्ट व सर्व तऱ्हेच्या मोटारच्या सामानाचे व्यापारी.

**अनुभव हीच आमची खात्री.**

लक्ष्मी रोड, पुणें. २

# राजहंस मेळ्यांतील पदें

कवी:—बा. ल. कमलाकर.

पद १ लें ( भूप—त्रिताल. )

वंदन पादि हे इशा । पुरुषोत्तम परमेश्वरा ॥ धृ ॥
मधूसूदन जगजीवन प्रभूवर,
कोटी सूर्यसम ज्ञान तेज तव,
दे यश तुजसम सकलांना ॥ १ ॥

पद २ रें ( केदार झपताल )

वंदू हेरंबपद, आजी शुभारंभी, सुरभी यश
गाऊनी, गौरवुनि गुण कवनीं ॥ धृ ॥
बुद्धि दैवत कला, धाम विद्याचला, विकसवी
भूतला दलित पद पामरा ॥ १ ॥

पद ३ रें ( देसकार झपताल. )

सुमना प्रीति ठाई, मनभाव लव नाहीं,
गमते अमरताहि, । हीन चित्त मानी ॥ धृ ॥
अचले विचलरंग, क्षण जिवीं कुतरंग
वितरी सकल बंध, भूस्वर्ग हाही ॥ १ ॥

पद ४ थें ( सिंधोरा त्रिताल )

काननींहीं संगे हृदया, विधू भासे राणी ॥ धृ ॥
विमल बघुनि उभयांत समाधी
वनचर डुलतील रंगे ॥ १ ॥

पद ५ वें ( मिश्र कॉफी केरवा )

कशासि लटिकी मुखी कुपितता, सखे नयन
युग हळुच निरखिता ॥ धृ ॥
लपावेन क्रोधा, स्मित खळि गाली,
अधर नयन स्मित असे फसविता ॥ १ ॥

पद ६ वें ( **मिश्र मांड द्रुत एकताल** )

साहि विरह नच मनास, सखि पळभर भारी ।। धृ ।।
संमीलन जीवांचे, निगडित चिर हे
साचे, नाचे स्मृति जणु पदेच, दुखवी जीवा ।। १ ।।

पद ७ वें ( **अडाणा त्रिताल** )

अधम तम हा, सुचवित यामा, सौम्य आता
परि होईल काळा ।। धृ ।।
क्षणि तारका, गमतील कलिका,
भ्रांत दिठीचा शोध परी हा ।। १ ।।
कळा कशाची लेणी शवाची,
काव्यांत उल्कापाट साच हा ।। २ ।।
प्रभु रवि जाता, व्यापी जगता,
हळु हळु पसरुनि, भीषण छाया ।। ३ ।।

पद ८ वें ( **मिश्र मांड केरवा** )

अहा पहा फुलल्या कलिका, मोदभरे ऐकुनि पावा ।। धृ ।।
जाई जुई गुलाब चाफा, परस्परा पुसती गुंफा
मधुर नाद येई कुठुनि ?
मोद भरे ऐकुनि पावा ।।१ ।।
लता तशा पुसती तरुते, कवटाळुनि लाडिक हाते,
मधूर नाद येई कुठुनि ? मोदभरे ऐकुनि पावा ।। २ ।।
विहग आदि पिक कोकिल हे, साथितात मुरली स्वर हे,
थांबती परी फिरफिरुनि,
मोदभरे ऐकुनि पावा ।। ३ ।।
परब्रम्ह शोधू शकति, ? कोण कसे साधति जगति ?
एकरूप झाला नादें, मोदभरे ऐकुनि पावा ।। ४ ।।

पद ९ वें ( भीमपलास केरवा )

किती शोधिलें प्रभुराया, नंदनवनि शामला ॥ धृ ॥
मधुर बासरी नादानें,
मनी बावरी झाले,
आत्मरुप दावी मजला, आजि शाम तूं बला ॥ १ ॥

पद १० वें ( अरबी द्रुत एकताल )

लोकमान्य व्हाल कधी, हीच मानसीं चिंता ॥ धृ ॥
राव-बाबु-पंडितहि,
जगति वंद्य भूपतीही
परि उदास भूमाता, ना कळे खरा त्राता ॥ १ ॥

पद ११ वें ( जयजयवन्ती त्रिताल )

नंदन नंद अनंद मदंगा, सलिलज लपवि
अली, तेवि काय मम लपवुनि सखया,
रतवी पदकमलीं ॥ धृ ॥
तन मन मोहन भाव मदार्चन, पुलकित करि
सुकली, विर्भागमे लतिका तरु वेढी,
प्रेमे तरुहि कवळी ॥ १ ॥

पद १२ ( मारवा त्रिताल )

खेलत मम मनीं शाम रुसवा, लाल लाल मृदू
ओठ काय मिटे मिळता नयनी नयन तो ॥ धृ ॥
मानिचे रोधुनि स्मित दिठि काढी,
झणि गालहि तो फुगवी ॥ १ ॥

पद १३ वें ( शंकरा त्रिताल )

तुटती नभी तारका ॥ धृ ॥
द्युति जात लया, जड प्रस्तरता
पावत उल्का नाम हीन जानिका ॥ १ ॥

जरि स्वैर गुणा' पतिता ललना,
हरपत शीला, ठरत हीन कुलटा ॥ २ ॥

पद १४ वें ( मालकंस त्रिताल )

ही डागली तोफ, सोडी अनलधार, सर्वस्व
नाशी, दिसते जरी साफ ॥ धृ ॥
मन रंगलेले रंगांत गुंगे, गुंगी ' कुसुम ' वास
श्रृंगार आशा ॥ १ ॥

पद १५ वें ( देश त्रिताल )

सुयशा सदा जगि द्या अम्हाला,
विनती पदी तव विश्वपाला ॥ धृ ॥
प्रभूची आवड जरि होई आम्हा,
क्षणही नको यश येई घाला ॥ १ ॥

पद १६ वें ( तीलक का मोद त्रिताल )

तुजविण भारत उदास भासे, स्वर्ग सौख्य
तुज मोहवी कैसे ॥ धृ ॥
बलवन्ता ये त्यजुनि सुखासन,
भारत विनवितसे तुज ऐसे ॥ १ ॥

पद १७ वें सोहनी त्रिताल

हासो हासो हासो लोक अज्ञाते
स्पृश्य असो कीं अस्पृश्यहि तो,
धर्म प्रमते एकाची त्यते ॥ धृ ॥
प्रथम वंद्य ती धर्म भावना,
नंतर देश प्रेम हे करु ते ॥ १ ॥

पद १८ वें ( दुर्गा त्रिताल )

मधुर गमते त्वदिय बासरी, पवन संग सूर
मुदें ललकारी ॥ धृ ॥

मोहवी जगता, बासरी तव हरि,

करित सुखे हासरी ॥ १ ॥

पद १९ वें ( बहार त्रिताल. )

गा प्रभुगुण गानीं नाचोनी, गानगान

प्रिय प्रभुमन रिझवूं, प्रेमे त्याते आळवुनि ॥ धृ ॥

भक्तिभाव हे पुष्प बाहुल्या

नमनहि करु या पूजोनी ॥ १ ॥

पद २० वें ( तिलक कामोद त्रिताल. )

देश प्रेम प्रिय ज्याते, जागिया, सुख अभंग

श्रीरंग देत, निज निशिदिनीं सुजना हाते ॥ धृ ॥

देश देव मनि, पूजि नित्य जो, अन्य देव नात्याते

ऐसा जो, जगि नरवर लाभत तत्कृति प्रियतम होते ॥ १ ॥

पद २१ वें ( पटदीप )

आशांकित मानवा कासया, आशा निराशा

जिवा जाच पंथास ॥ धृ ॥

निगमा चराचर जगि व्यापीला जो

भावे भजाया प्रभू रामचंद्रास ॥ १ ॥

पद २२ वें ( मांड )

यदुराज गेला गोकुळीचा, ब्रिजवनी या नाद आला ॥ धृ ॥

तनु कोमला मीं राधा बाला, राजहंस तो

लपविला, कुणी बोला ॥ १ ॥

पद २३ वें ( मांड )

अहा काय शोभा पहा ही नभाली, जमु तारका

ही करी प्रेम लीला, शशिराज वितरी मुदे

कौमुदीला, परी एक परदास्य ने सर्व विलया ॥ १ ॥

लावणी—कोकणची पोर.

लचक चमक जणु बादल बिजली ।
मोहक गजरा घालुन सजली ।
खांद्यावरती पदर विलसला
काठ जरीचा सुबक शोभला ।
मुख जणु कोमल कलिका खुलली ॥ १ ॥

जोगी

होई विकस मन का आता, तनय दाह करी
हृदया ताता ॥ ध ॥
ठाव सतत हृदीं कोमल भावा, साहत हीनच
आपद चिंता ॥ १ ॥

×

हा तोष मनि जाहला, जाऊ शरण अजि त्या प्रभूला ॥ ध ॥
भूमाते प्रति दे सुयशाला, धाव झणी प्रभू दीन दयाळा,


REFBK-0005631

५६३१

थोड्या अवधीत प्रसिद्धीस आलेले पुण्यातील हायक्लास पेंटर्स

दत्त पेंटिंग

लक्ष्मी, रोड गणेश चौक, पुणें.

पेंटिंगचें काम देण्यापूर्वीं प्रथम येथें चौकशी करा.

बापुराव रामशेट वाईकर

मुख्य दुकान कसबा गणपती,
शुद्ध चांदीची भांडी व सोन्याच्या दागिन्यांचे व्यापारी.
शाखा तुळशीबाग पुणें.

# जाहिर विनंती.

## जेधे यांचा, मराठा प्रिंटिंग प्रेस,

जेधे मॅन्शनसमोर, ७७ वेताळ पेठ, पुणें २.

आमचे प्रेसमध्यें सर्व प्रकारची, लहान व मोठीं कामें
माफक दरांत सुबक प्रिंटिंगमध्यें, व सफाईदार
बाइंडींगमध्यें वेळेवर करून मिळतात
तरी गिन्हाईकांनीं या संधीचा अवश्य
फायदा घ्यावा अशी विनंती आहे.

प्रोप्रायटरः—वाय्. बी. जेधे.
मॅनेजरः—आर. बी. देशमूख.

**बाहेरगांवाचे ऑर्डरीकडे विशेष लक्ष दिलें जाईल**

---

## मारुतिराव बाबाजी जेधे, देशमूख.

सांगली तपेली, राजापुरी व पेचाचे तांबे, पितळी समया,
देशी व विलायती घाटाच्या घंटा व सर्वतऱ्हेचे ओतीव
कारखानदार, व्यापारी व कमिशन एजंट.

दुकानः—६८५ वेताळ पेठ, पुणें.
कारखानदारः—जेधे मॅन्शन, शुक्रवार पेठ, पुणें.

# कोकणची पोर



सुमित्राः-अग बाई, बाई, किती ढेकूण हायता
ह्यामंदी ?